
REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X

VOLUME - 8 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2019

# संस्थानांच्या विलिनीकरणातील सरदार वल्लभभाई पटेल यांचे योगदान

**प्रा. श्रीमती सुरेखा रामदास लगड**
**सहायक प्राध्यापक,इतिहास विभाग,**
**रा.ब. नारायणराव बोरावके कॉलेज, श्रीरामपूर.**



**गोषवारा**

*व्यापाराच्या उद्देशाने भारतात आलेल्या इंग्रजांनी आपले लक्ष भारतीय राजकारणाकडे वळविले. आपल्या साम्राज्य विस्तारास सुरुवात त्यांनी बंगालच्या प्रांतापासून केली. त्यासाठी इंग्रजांना तेथे प्लासीचे युध्द करावे लागले. याच युध्दाने त्यांना साम्राज्य विस्ताराची गुरूकिल्ली मिळाली तर १७६४ च्या बक्सार युध्दाने ब्रिटिश साम्राज्याचा पाया अधिकच मजबूत झाला. प्लासीच्या युध्दानंतर पुढील शंभर वर्षाच्या कालावधीत ईस्ट इंडिया कंपनीने संपूर्ण भारतातवर आपले नियंत्रण प्रस्तापित केले. अनेक राज्य त्यांनी साम, भेद, दंड नितीचा वापर करुन जिंकून घेतले. लॉर्ड वेलस्लीने तर तैनाती फौजेचे जाळे टाकून अनेकांना जेरदस्त केले. तैनाती फोजेस पध्दतशीर स्वरुप दिल्याने भारतीय राज्यकर्त्यामध्ये आकर्षण निर्माण झाले. त्यातूनच अनेक राजे, महाराजे, नबाब यांनी या पध्दतीचा स्वीकार केला. ग.ज. लार्ड डलहौसीच्या काळात तर त्याने या ना त्या कारणाने अनेक संस्थाने खालसा केली. व ब्रिटिश साम्राज्यात विलिन केली. पण याच साम्राज्यवादी वरवंटयाखालून जी काही संस्थाने वाचली, त्यांना १८५७ च्या उठावाने व त्यानंतर प्रसिध्द झालेल्या राणीच्या जाहिरनाम्याने जीवनदान मिळाले. १८५७ च्या उठावानंतर ईस्ट इंडिया कंपनीचे राज्य जावुन तीच्या जागी इंग्लडच्या राणीसरकारचे राज्य सुरु झाले. आणि राणीने संस्थानिकांना जीवनदान दिले. राणीने सत्तेवर येताच जाहिर केले कि, हिंदी संस्थानिकांनी धास्ती खाण्याचे कारण नाही. राणी सरकारने संस्थानिकांना दिलेले अश्वासन काळजीपूर्वक पाळले. येथून पुढे काही तरी कुरापती काढून इंग्रज सरकार हिंदी संस्थाने खालसा करणार नव्हते ही गोष्ट खऱ्या अर्थाने संस्थानिकांना दिलासा देणारी होती. अशा या संस्थानिकांचा अभ्यास आपण येथे करणार आहोत.*

***बीजशब्द :*** *संस्थान विलिनीकरण, सरदार वल्लभभाई पटेल.*

## प्रस्तावना :

शेकडो वर्षापासून आपला देश अनेक राज्यांत विभागला गेला होता. प्राचीन काळी व मध्ययुगाच्या काळी काही मोठी साम्राज्य निर्माण झाली हे खरे, पण ज्याला आपण राष्ट्र म्हणतो असे हिंदी अथवा भारतीय राष्ट्र निर्माण होऊ शकत नव्हते. अनेक राज्य अनेक जातीजमाती अनेक धर्म अनेक पंथ अशा वैविध्याने परिपूर्ण असणाऱ्या या देशात कधी काळी राष्ट्र निर्माण होईल असे वाटत नव्हते. परंतु युरोपियांच्या अगमनाबरोबरच ही उणीव भरुन निघाली भारतात अनेक युरोपीयन सत्तांनी आगमन केले त्यातीलच पोर्तुगीज खलाशी वास्को-दि-गामांचे कालिकत बंदरातील पहिले पाऊल म्हणजेच युरोपियनांच्या व्यापाराला भारतात झालेली सुरूवातच म्हणावी लागेल. भारतात सर्वप्रथम व्यापाराच्या निमित्ताने पोर्तुगीज आले त्यानंतर १६०२ मध्ये डच आले. नंतर इंग्रज, फ्रेंच इत्यादी व्यापारी आले व ते भारतात व्यापार करू लागले

याच व्यापारातून त्यांच्यात स्पर्धेला सुरुवात झाली. त्यातूनच इंग्रज - फ्रेंच संघर्ष झाला. त्यातूनच कर्नाटकात तीन युध्दे लढली गेली. यात अंतिम विजय इंग्रजांनाच मिळाला व ते सत्ता स्पर्धेत यशस्वी झाले.

सुरुवातीला भारतात व्यापारी म्हणून आलेले इंग्रज भारताचे राज्यकर्ते बनले. व्यापाराच्या उद्देशाने भारतात आलेल्या इंग्रजांनी आपले लक्ष भारतीय राजकारणाकडे वळविले. आपल्या साम्राज्य विस्तारास सुरूवात त्यांनी बंगालच्या प्रांतापासून केली. त्यासाठी इंग्रजांना तेथे प्लासीचे युध्द करावे लागले. याच युध्दाने त्यांना साम्राज्य विस्ताराची गुरुकिल्ली मिळाली तर १७६४ च्या बक्सार युध्दाने ब्रिटिश साम्राज्याचा पाया अधिकच मजबूत झाला. अर्थातच तो खऱ्या अर्थाने रोवला गेला. प्लासीच्या युध्दानंतर पुढील शंभर वर्षाच्या कालावधीत ईस्ट इंडिया कंपनीने संपूर्ण भारतातवर आपले नियंत्रण प्रस्तापित केले. अनेक राज्य त्यांनी साम, भेद, दंड नितीचा वापर करून जिंकून घेतले. लॉर्ड वेलस्लीने तर तैनाती फौजेचे जाळे टाकून अनेकांना जेरदस्त केले. तैनाती फोजेस पध्दतशीर स्वरुप दिल्याने भारतीय राज्यकर्त्यामध्ये आकर्षण निर्माण झाले. त्यातूनच अनेक राजे, महाराजे, नबाब यांनी या पध्दतीचा स्वीकार केला. ग.ज. लार्ड डलहौसीच्या काळात तर त्याने या ना त्या कारणाने अनेक संस्थाने खालसा केली. व ब्रिटिश साम्राज्यात विलिन केली. पण याच साम्राज्यवादी वरवंटयाखालून जी काही संस्थाने वाचली, त्यांना १८५७ च्या उठावाने व त्यानंतर प्रसिध्द झालेल्या राणीच्या जाहिरनाम्याने जीवनदान मिळाले. १८५७ च्या उठावानंतर ईस्ट इंडिया कंपनीचे राज्य जावुन तीच्या जागी इंग्लडच्या राणीसरकारचे राज्य सुरु झाले. आणि राणीने संस्थानिकांना जीवनदान दिले. राणीने सत्तेवर येताच जाहिर केले कि, हिंदी संस्थानिकांनी धास्ती खाण्याचे कारण नाही. राणी सरकारने संस्थानिकांना दिलेले अश्वासन काळजीपूर्वक पाळले. येथून पुढे काही तरी कुरापती काढून इंग्रज सरकार हिंदी संस्थाने खालसा करणार नव्हते ही गोष्ट खऱ्या अर्थाने संस्थानिकांना दिलासा देणारी होती. अशा या संस्थानिकांचा अभ्यास आपण येथे करणार आहोत.

## ➢ अभ्यासाचे महत्व:

प्रस्तुत अभ्यासात सरदार वल्लभभाई पटेल यांचे संस्थानांच्या विलिनिकरणातील योगदान विशद करण्यात आलेले आहे. प्रस्तुत संशोधनात सरदार वल्लभभाई पटेल यांचे संस्थानाच्या विलिनिकरणातील कणखर धोरणाची सांगोपांग चर्चा करण्यात आली आहे. त्यामुळे या संशोधनाचा फायदा संशोधक, विदयार्थी, शिक्षक व समाज यांना होईल. यात शंका नाही.

## ➢ उद्दिष्टे :-

१) स्वतंत्र भारतातील संस्थानांची परिस्थिती समजावून घेणे.
२) स्वतंत्र भारतातील विलीनीकरणाबाबत संस्थानिकांची भूमिका समजावून घेणे.
३) स्वतंत्र भारताच्या विलीनिकरणातील सरदार वल्लभभाई पटेल यांचे योगदान समजावून घेणे.
४) स्वतंत्र भारताच्या संस्थानांच्या विलिनिकरणाचे महत्त्व समजावून घेणे.

## ➢ संशोधन पध्दती :-

प्रस्तुत संशोधनाचा अभ्यास करताना संशोधकाने दुय्यम साधनसामुग्रीच्या सहाय्याने तथ्य संकलन केले आहे. यात विविध संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्रातील लेख, विविध वेबसाईट, मासिके यांच्या साहयाने माहितीचे संकलन केले आहे.

## • उद्दिष्टे क्र. १:-

### * स्वतंत्र भारतातील संस्थानांची परिस्थिती :-

स्वातंयप्राप्तीच्या वेळी भारताला ज्या अनेक समस्यांना तोंड दयावे लागले त्यापैकी संस्थानांच्या विलिनीकरणाची समस्या अतिश गंभीर स्वरूपाची होती. त्यावेळी भारतातील संस्थानांची संख्या सहाशेच्या आसपास होती. त्यांच्या कायदेशीर दर्जा संबंधी काही ठाम निर्णय घेतल्याखेरीज भारतातील सार्वभौमत्वास अर्थ राहिला नसता. म्हणूनच या संस्थानांचे भारतात विलिनीकरण घडवून आणण्याच्या प्रश्नाला प्राधान्य दिले. 'फ्रीडम अॅट मिडनाईट' या ग्रंथात संस्थानिकांबाबत विस्तृत माहिती मिळते.

ब्रिटिश काळात आपल्या देशात दोन हिंदुस्थान नांदत होते. एक म्हणजे ब्रिटिशांच्या ताब्यात असणारा हिंदुस्थान, तर दुसरा म्हणजे संस्थानिकांच्या ताब्यात असणारा हिंदुस्थान, असे त्यांचे स्वरूप होते. त्यापैकी संस्थानिकांच्या ताब्यातील काही संस्थाने मोठी होती. तर काही संस्थाने छोटी होती. हैद्राबाद, काश्मीर त्रावणकोर ही संस्थाने मोठी उदा. हैद्राबादची लोकसंख्या १ कोटी ४० लक्ष तर सर्वात लहान संस्थानाची लोकसंख्या फक्त ७२ होती. उठावानंतर राणी व्हिक्टोरिया हिने

संस्थानिकांना अभय दिल्याने भारतातील संस्थानिकांनी ब्रिटिशांना खुश ठेवून आपली सत्ता सुरक्षित ठेवण्यातच धन्यता मानली. या उलट या संस्थानिकांनी प्रजेच्या बाबतीत जुलमी व असहिष्णु धोरण स्वीकारले. संस्थानिकांचा आधुनिक विचार व नव्या सुधारणांना विरोध होता. सहाजिकच बहुसंख्य संस्थानातील प्रजेची स्थिती अतिशय शोचनीय बनली. या संस्थानामध्ये एकाच प्रकारची राज्यकारभार पध्दती होती असे नाही. काही संस्थानिकांनी आपल्या प्रजेस लोकशाहीचे हक्क (मर्यादित का होईना) बहाल केले होते. तर काही संस्थाने आपल्या प्रजाजनांना गुलामाप्रमाणे वागवित होती. बडोदयासारख्या संस्थांनात अर्वाचीन सुधारणा घडवून आल्या होत्या. तर जुनागढ संस्थानाचे अधिपती आपल्या रोशन नावाच्या कुत्रीचे लग्न १२ लक्ष रूपये खर्च करून मोठया थाटामाटात घडवून आणण्यात धन्यता मानत होते.

- **उद्दिष्टे क्र. २:-**

* **स्वतंत्र भारतातील विलीनीकरणाबाबत संस्थानिकांची भूमिका :-**

दुसऱ्या महायुध्दानंतर हिंदुस्थानला स्वातंत्र्य देण्याच्या दृष्टिने अधिक गतीने हालचाली होऊ लागल्या. हिंदुस्थानचे स्वातंत्र्य दृष्टिक्षेपात येवू लागले. इंग्रज हिंदुस्थान सोडून जाणार हे निश्चित झाले होते. पण त्यांच्यासमोर दोन समस्या होत्या. एक म्हणजे मुस्लिम लीगची स्वतंत्र पाकिस्तानची मागणी, व दुसरी म्हणजे हिंदी संस्थानिकांचा प्रश्न. इंग्रज सरकारने आपली हिंदुस्थान वरील साम्राज्य सत्ता व अधिसत्ता बरखास्त करीत असता फारच कायदेशीर व घटनात्मक भूमिक घेतली इंग्रज हा देश सोडून जातील तेव्हा त्यांच्या ताब्यातील प्रदेश स्वतंत्र होणारच, पण त्याचबरोबर ज्यांच्यावर त्यांची अधिसत्ता होती अशी संस्थाने देखील स्वतंत्र होणार होती. ३ जून १९४७ रोजी करण्यात आलेल्या भारतीय स्वातंत्र्याच्या कायदयात संस्थानांना स्वातंत्र्य देण्यात आले. परंतु त्यामुळे देशाचे तुकडे होण्याची शक्यता निर्माण झाली. संस्थानिकांनी स्वतंत्र रहावे की कोठे सामिल व्हावे यासाठी तोडगा काढण्याचा प्रयत्न सरदार वल्लभभाई पटेल यांनी केला. स्वातंत्र्यानंतर हा प्रश्न भारत सरकारने अत्यंत कुशलतेने हाताळला. सरदार पटेलांनी सामिलीकरणाचा करार तयार केला. त्यानुसार भौगोलिक सान्निध्यानुसार सामिलीकरणाचा निर्णय घ्यावा असे संस्थानिकांना आव्हान केले. त्यांच्या आव्हानास हैद्राबाद जुनागड व काश्मीर वगळता इतर संस्थानिकांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. देशी संस्थानाचे विलिनीकरण चार प्रकारांनी केले. १५ ऑगस्ट १९४७ पूर्वी जुनागढ, हैद्राबाद, काश्मीर वगळता सर्व संस्थाने भारतात विलिन झाली.

- **जुनागढ :-**

जुनागढच्या नवाबाने येथील जनतेच्या इच्छेविरूध्द पाकिस्तानात सामिल होण्याचा एकतर्फी निर्णय घेतला. यामुळे येथील जनतेने नवाबांविरुध्द उठाव केला. जनतेच्या इच्छेवरून भारत सरकारने आपले सैन्य तेथे पाठविले २२ ऑक्टोबर १९४७ रोजी जुनागढ संस्थान ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर तेथे सर्वमत घेण्यात आले. बहुसंख्य जनतेने भारतात विलिन होण्याच्या बाजूने कौल दिला. अशा प्रकारे हे संस्थान भारतात विलिन करण्यात आले.

- **हैद्राबाद :-**

हैद्राबादच्या निजामाने आपले स्वतंत्र अस्तित्व राखण्याचे ठरविले. त्याने या प्रश्नावर जनमताचा कौल घेण्यासही नकार दिला. तसेच आपणास अनुकूल असणाऱ्या रझाकार संघटनेमार्फत तेथील जनतेवर अत्याचार केले. त्यामुळे सरदार वल्लभभाई पटेलांनी निजामाविरूध्द पोलीस कारवाई करण्याचे ठरवून भारतीय सैन्य हैद्राबाद मध्ये पाठविले. त्यानंतर निजामाने शरणागती पत्करली. सामिलनाम्यावर सही केली. १८ सप्टेंबर १९४८ हैद्राबाद भारतात विलिन करण्यात आले.

- **काश्मीर :-**

काश्मीरचा राजा हरिसिंग यानेही प्रथम स्वतंत्र राहण्याचा निर्णय घेतला. परंतु पाकिस्तानने टोळीवाल्यांच्या वेशात आपले सैन्य काश्मीरमध्ये घुसविल्यावर राजा हरिसिंगने भारताकडे मदतीसाठी धाव घेतली. २६ ऑक्टोबर १९४७ रोजी त्याने काश्मीरच्या भारतातील सामिलनाम्यावर सही केली. त्यानंतर भारताने आपले सैन्य काश्मीरमध्ये पाठवून पाकिस्तानी सैन्यास मागे रेटले. दरम्यानच्या काळात संयुक्त राष्ट्रसंघाने युध्दबंदी घडवून आणली दुर्दैवाने काश्मीरचा-भारताच्या या अविभाज्य घटकाचा काही भाग पाकिस्तानच्या ताब्यात राहिला.

- **उद्दिष्टे क्र. ३:-**

* **स्वतंत्र भारताच्या विलीनिकरणातील सरदार वल्लभभाई पटेल यांचे कार्य / योगदान :-**

भारतीय संघराज्यात संस्थानांचे विलिनिकरण घडवून आणण्यात सरदार वल्लभभाई पटेल यांनी अत्यंत मोलाची भूमिका पार पाडली. भारताचे सुदैव कि अशा कठीण प्रसंगी सरदार वल्लभभाई पटेल यांच्यासारख्या दुरदर्शी, मुत्सद्दी व राष्ट्रप्रेमी व्यक्तीचे खंबीर नेतृत्व देशाला मिळाले. हंगामी सरकारात नव्याने संस्थान खाते निर्माण केले गेले व त्याचे प्रमुखपण सरदार वल्लभभाई पटेलांनी आपल्याकडे घेवून श्री. व्ही. पी. मेनन सारख्या मुसद्दी व्यक्तीला त्या खात्याचे सचिवपद दिले. संस्थानांच्या विलिनिकरणाचे श्रेय सरदार वल्लभभाई पटेल, व्ही. पी. मेनन, व लॉर्ड माऊंट बॅटन या त्रयीला दिले पाहिजे. सरदार पटेलांची हुशारी, करारीपणा, राजकारणपटुत्व या गुणांचा देशाला ऐन मोक्याच्या वेळी उपयोग झाला.

भारताचे गृहमंत्री या नात्याने त्यांनी संस्थानिकांशी विलिनिकरणाच्या प्रश्नाबाबत विचारविनिमय केला. भारताचे ऐक्य तसेच संस्थानी प्रजेची प्रगती या दृष्टीने संस्थानिकांनी आपली संस्थाने भारतात विलिन करणे कसे हिताचे आहे हे सरदार वल्लभभाई पटेलांनी संस्थानिकांना पटवून दिले. काळाची पाऊले ओळखून अनेक संस्थानिकांनी सामीलनाम्यावर स्वखुशीने सहया केल्या. काही संस्थानातील प्रजेनेच विलिनीकरणाच्या बाजूने चळवळी सुरू केल्या. त्यामुळे अनेक संस्थानिकांना विलिनिकरणास मान्यता द्यावी लागली. यापुढे आपले स्वतंत्र अस्तित्व टिकवून धरणे शक्य नाही. याची त्यांना खात्री पटली होती. त्यातूनच काही संस्थानिकांनी भारतात विलिन होण्यास थोडीफार खळबळ केली सरदार वल्लभभाई पटेलांनी अशा संस्थानिकांच्या बाबतीत कडक भूमिका स्वीकारली त्यासाठी त्यांना साम, दाम, दंड या मार्गाचा अवलंब करावा लागला.

* **संस्थानांच्या विलिनिकरणाचे महत्त्व :-**

भारतीय संस्थानांचा प्रश्न सरदार वल्लभभाई पटेल व व्ही. पी. मेनन यांनी अतिशय कणखर भूमिका ठेवून, संस्थानिकांबाबत सहानुभूतीचा दृष्टीकोन ठेवून यशस्वीरित्या सोडविला. हिंदुस्थानच्या या पोलादी पुरुषाने राष्ट्रनिर्मितीच्या मालिकेत अत्युच्य स्थान प्राप्त केले. त्यांना भारताचा बिस्मार्क म्हटले जाते. सरदार वल्लभभाई पटेल यांच्यामुळेच देशाचे लहान लहान तुकडे झाले नाहीत. भारताची एकात्मता निर्माण होण्यास मदत झाली. भारतीय घटनाकारांना घटना करणे सोपे झाले. याशिवाय संस्थानातील नागरिकांना समान दर्जा मिळाला. संस्थानांच्या प्रगतीचा मार्ग खुला झाला. संस्थानिकांचे सामिलीकरण झाल्याने आजचा अखंड भारत तयार झाला. गेल्या शेकडो वर्षाचे देशाचे स्वप्न साकार झाले.

- **संदर्भ :-**


१) गाठाळ, साहेबराव. (१९९८), *“आधुनिक भारताचा इतिहास”,* (१८८५ ते १९४७), औरंगाबाद, कैलास पब्लिकेशन्स.
२) आठल्ये, विभा. (२००४), *“आधुनिक भारताचा इतिहास”*, (१७६० ते १९५०), नागपूर? अशुल पब्लिकेशन्स.
३) वक्काणी, नि. आ. (१९९८), *“आधुनिक भारताचा इतिहास ब्रिटिश कालीन भारत”,* (१७५७ ते १९६५), नागपूर, श्री मंगेश प्रकाशन.
४) शहा, जी. बी. आणि भामरे, आर. पी. आणि पवार, एम. डी. (२०१४) *“आधुनिक भारताचा इतिहास”,* (१७५७ ते १९५०) जळगाव, प्रशांत प्रकाशन.
५) गाठाळ, एस. एस. (२०१५), *“भारतीय राष्ट्रीय चळवळीचा इतिहास”*, औरंगाबाद, कैलास पब्लिकेशन्स.
६) वैद्य, सुमन आणि कोठेकर, शांता (१९९६) *“आधुनिक भारताचा इतिहास”,* (१८५८ ते १९२०) नागपूर, श्री. साईनाथ प्रकाशन.
७) पवार, जयसिंगराव आणि पवार, वसुधा, *“आधुनिक हिंदुस्थानचा इतिहास”.* (१७५७ ते १९५०) नागपूर, विद्या प्रकाशन.
८) www.googal.co.in.
९) www.yahoo.com.